संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

E-mail:
sqaafmh@maa.ac.in


जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/ ०२३६९

दिनांक: ११/०४/२०२५

प्रति,

संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे
सहसंचालक/उपसंचालक, शिक्षण विभाग (सर्व)
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
शिक्षणाधिकारी (प्राथ., माध्य.), जिल्हा परिषद (सर्व)...

**विषय:** शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) लिंकमध्ये स्वयं-मूल्यांकन नोंदणी, पूर्तता व भरलेल्या माहितीत अपेक्षित बदल करावयास मुदत देणेबाबत...

संदर्भ: १. जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/००५८२ दि. ०३/०२/२०२५
२. जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/०१०९७ दि. २७/०२/२०२५
३. जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/०१४१६ दि. १२/०३/२०२५
४. जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/०२०४४ दि. २८/०३/२०२५

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयं-मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या maa.ac.in या वेबसाईटवरील SQAAF टॅबवर http://scert-data.web.app/ या नावाने स्वयं-मूल्यांकनासाठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये माहिती भरण्यास संदर्भ क्र. ०२ व ०३ ने आवश्यकतेनुसार वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. त्याचबरोबर संदर्भ क्र. ०४ ने १००% शाळांची स्वयं-मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण व्हावी म्हणून दि. १०.०४.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती त्यात जवळपास ९९% शाळांची नोंदणी तर ८७% शाळांची स्वयं-मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण झालेली दिसून येत आहे. बाह्य-मूल्यांकन हे जून व जुलै, २०२५ मध्ये नियोजित आहे. तसेच, मुख्याध्यापक यांनी स्वयं-मूल्यांकनात दिलेले पुरावे यात अपेक्षित बदल व सुधारणा करावयाची असल्यास तो बदल करता यावा म्हणून पुढील काही दिवस स्वयं-मूल्यांकनाची लिंक सुरु ठेवण्यात येत आहे.

तरी, आपल्या विभागातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयं-मूल्यांकन नोंदणी, पूर्तता लवकरात लवकर १००% होईल व स्वयं-मूल्यांकनात दिलेले पुरावे यात अपेक्षित बदल व सुधारणा पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी.

Sd/- 11/04/25

(राहूल रेखावार, भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**प्रत माहितीस्तव :**

मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with OKEN Scanner